■ e-paper.diwanews.com ■ सोमवार, ६ जानेवारी २०२५ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. ■ RNI No.-MAHMAR/2021/80669 www.diwanews.com

दिशादर्शक, मार्गदर्शक!


# दिवा न्यूज

वर्ष–४

अंक–२३




# ठामपाने डिसेंबर महिन्यात हटवले ३ हजार ८९१ अनधिकृत फलक




## ७६ प्रकरणात गुन्हे दाखल

### अनधिकृत फलक हटवण्याची मोहीम सतत सुरू ठेवण्याचे महापालिका आयुक्त सौरभ राव यांचे निर्देश

**ठाणे** : डिसेंबर-२०२४ मध्ये ठाणे महापालिका क्षेत्रातील सर्व प्रभागांमधून ३ हजार ८९१ अनधिकृत फलक, पोस्टर्स, बॅनर्स हटवण्यात आले.तर, ७६ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.अनधिकृत फलक हटवण्याची मोहीम सातत्याने सुरू ठेवण्याचे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत.

ठाणे महापालिकेच्या अतिक्रमण विभाग आणि प्रभाग समिती यांच्या मार्फत डिसेंबर महिन्यात ३ हजार ८९१ अनधिकृत फलक, पोस्टर्स, बॅनर्स हटवण्यात आले. ही कारवाई सहाय्यक आयुक्तांमार्फत सातत्याने सुरू आहे. एकूण ७६ प्रकरणात गुन्हेही दाखल करण्यात आल्याची माहिती उपायुक्त (अतिक्रमण) शंकर पाटोळे यांनी दिली.

महापालिका क्षेत्राचे विद्रुपीकरण थांबवण्यासाठी दैनंदिन मोहीम राबवून अनधिकृत फलक हटवण्याची आवश्यकता आहे. त्याबाबत, मा. उच्च न्यायालयाचेही अतिशय काटेकोर आदेश आहेत. त्याचे पालन सगळ्यांनी करावे. अनधिकृत पोस्टर, बॅनर, फलक लावला की त्यावर नोटीस आणि गुन्हे दाखल करणे ही कारवाई अतिशय प्रभावीपणे करण्यात यावी, असे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत.

तसेच, ठाणे महापालिका हद्दीत अधिकृत फलक लावण्यासाठी जाहिरात विभागाने जागा निश्चित केल्या आहेत. त्याचे शुल्क भरून केवळ त्याच ठराविक भागात फलक लावता येणार आहेत. त्याबाबत संबंधितांनी सहकार्य करावे असे आवाहन उपायुक्त शंकर पाटोळे यांनी केले आहे.

| प्रभाग | हटवण्यात आलेले फलक | गुन्हे |
|---|---|---|
| नौपाडा-कोपरी | ७६२ | ११ |
| वागळे इस्टेट | ३७३ | २ |
| लोकमान्य/सावरकर नगर | ३४२ | १० |
| वर्तकनगर | ४५३ | ६ |
| माजिवडा-मानपाडा | ३५३ | ७ |
| उथळसर | ३३८ | ३ |
| मुंब्रा | ४५६ | १५ |
| कळवा | ४०९ | १८ |
| दिवा | ४०५ | ४ |
| **एकूण** | **३८९१** | **७६** |

# अर्थसंकल्पीय अधिवेशनात मिळणार गृहनिर्माण संस्थांना न्याय

## मुख्यमंत्र्यांनी घेतली महाअधिवेशनातील ठरावांची दखल

ठाणे : गृहनिर्माण संस्थांच्या महाअधिवेशनात पारित केलेल्या सर्व ठरावांची राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दखल घेतली असुन, त्या त्या विभागांच्या बैठका घेऊन निर्णय घेणार असल्याचे स्पष्ट केले. तसेच, येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात गृहनिर्माण संस्थांच्या विविध मागण्यांबाबत विचार करण्याचे मुख्यमंत्र्यांनी आश्वस्त केले. अशी माहिती ठाणे डिस्ट्रिक्ट हाऊसिंग फ ेडरेशनचे अध्यक्ष सीताराम राणे यांनी दिली.

मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सीताराम राणे यांनी विधान परिषद गटनेते आ. प्रविण दरेकर यांच्या सहीत भेट घेतली. यावेळी ठाण्यात प्रथमच अशा प्रकारे गृहनिर्माण संस्थांचे भव्य महाअधिवेशन आयोजित केल्याबद्दल अभिनंदन केले.

सहकार विभाग आणि ठाणे डिस्ट्रिक्ट हाऊसिंग फेडरेशनच्या संयुक्त विद्यमाने ठाण्यात नुकतेच गृहनिर्माण संस्थांचे महाअधिवेशन पार पडले. या अधिवेशनात मुख्यमंत्री फडणवीस यांनी दुरध्वनीच्या माध्यमातून हजारोच्या जनसमुदायाशी ऑडियो संवाद साधला होता. यावेळी त्यांनी, गृहनिर्माण संस्थांचे पुर्नविकास तसेच स्वयंपुर्नविकास यासह इतर छोट्या मोठया अडचणी सोडवण्याचे जाहिर वचन दिले होते. या अनुषंगाने, सीताराम राणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत भेट घेतली. यावेळी महाअधिवेशनात पारित झालेल्या ठरावांच्या गोषवाऱ्यासह सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या मागण्यांचा विस्तृत अहवाल श्री. राणे यांनी मुख्यमंत्र्यांना सादर केला. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये अधिनियम १५४ ब मध्ये सुधारणा करण्यासह स्वयंपुर्ण पुर्नविकासाबाबत २०१९ च्या परिपत्रकाची अंमलबजावणी करून लवकरच जिल्हा महासंघांना अधिसुचित करण्यात येईल. असे स्पष्ट केले. गृहनिर्माण सोसायट्यामध्ये पाळीव प्राण्यांविषयीच्या प्रश्नासंदर्भात त्यांनी, या विषयाशी संबंधित विभागातील अधिकाऱ्यांची बैठक बोलावून याविषयीची नियमावली करण्याबाबत विचार केला जाईल. त्याचबरोबर, गृहनिर्माण संस्थांच्या इतर विविध प्रश्न व ठरावां संदर्भात सहकार व गृहनिर्माण खात्यासह त्या त्या विभागाची बैठक घेऊन निर्णय घेण्याचे आश्वस्त केले.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
www.diwanews.com
सोमवार, दि. ६ जानेवारी २०२५


# दिवा विकास प्रतिष्ठान तर्फे विविध स्पर्धांचे आयोजन

**दिवा:-** दिवा विकास प्रतिष्ठान तर्फे मुंब्रा देवी कॉलनीतील गुरुदत्त नगर येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी लहान मुलांसाठी चित्रकला स्पर्धा, महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच महिलांसाठी विशेष कार्यक्रम खेळ पैठणीचा देखील आयोजित करण्यात आला होता.सदर कार्यक्रम माजी नगरसेवक शैलेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली समाजसेवक कैलेश पाटील यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता.










# सागरी किनारा मार्गावरील बोगद्याजवळ हुल्लडबाजी करणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई

**मुंबई :** सागरी किनारा मार्गावरील बोगद्याजवळ आज दुपारी ४ च्या दरम्यान दोन युवक निष्काळजी व भरधाव वेगाने हुल्लडबाजी (कार रेसिंग) करत वाहने चालविताना आढळून आले आहे. यामधील वाहन क्रमांक एम. एच १२ एफ वाय ७२६३ या वाहनाचा सागरी किनारा रस्त्याचे भिंतीला धडकून अपघात झाला. या वाहन चालकावर मलबार हिल पोलिस स्टेशन येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र मोटार वाहन विभागाकडून एम एच १२ एफ वाय ७२६३ व एम एच ०३ एडब्ल्यू २२५५ ही वाहने दोन्ही वाहने जप्त करण्यात आली आहेत. त्यांना मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, दोन्ही वाहन चालकांचे परवाना तीन महिन्यांकरिता निलंबित करण्यात आला आहे.

राज्यामध्ये १ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२५ या कालावधीत रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येत आहे. रस्ते अपघात नियंत्रित ठेवण्याच्या दृष्टीने सन-२०२५ या वर्षात रस्ता सुरक्षा अभियानानिमित्त विविध विभागांमार्फत कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

अनेक शहरांमध्ये, विशेषतः महामार्गावर तरूण मुले बाईक रेसिंग अथवा कार रेसिंग करत असल्याचे आढळून आले आहे. याप्रकारे वाहन चालविणे हे मोटार वाहन कायद्याच्या भंग करणारे असून यामुळे निष्पाप नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण होत आहे. यासंदर्भात परिवहन विभागाने मोहिम सुरू केली आहे. जर अशा पध्दतीने वाहने चालविणारे आढळून आल्यास अशा व्यक्तींची वाहने जप्त करण्यात येवून अशा वाहनांची भारतीय न्याय संहिता, मोटार वाहन अधिनियम १९८८ कलम अन्वये गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत. याची सर्व नागरिकांनी नोंद घेऊन नियमानुसारच वाहने सुरक्षितपणे चालवावीत, असे आवाहन सहपरिवहन आयुक्त रवि गायकवाड यांनी केले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

# सर्व मेट्रोंचे कामे पूर्ण होण्याचे वेळापत्रक नव्याने तयार करा

## – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



### प्रत्येक मेट्रो मार्गाचा घेतला आढावा

**मुंबई :** एमएमआरडीए क्षेत्रातील सर्व मेट्रोंचे कामे पूर्ण होण्याचे वेळापत्रक नव्याने तयार करा; या कामांना विलंब चालणार नाही, पुढच्या वर्षीपासून दरवर्षी किमान ५० किमी मेट्रो कार्यान्वित होतील, असे नियोजन करा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिले.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची (एमएमआरडीए) आढावा बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी श्री फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, नगरविकास राज्यमंत्री श्रीमती माधुरी मिसाळ उपस्थित होते.

यावेळी श्री फडणवीस म्हणाले, अनेक ठिकाणी कारशेड शिवाय मेट्रो सुरू होत आहेत, त्यामुळे मेट्रो सुरू करण्यासाठी त्यासाठी थांबू नका. जगात असे प्रयोग होत आहेत, त्याचा अभ्यास करा. त्याला तात्पुरत्या पर्यायी व्यवस्था काय आहेत, याचा आढावा घ्या. भविष्यातील सर्व संभाव्य मेट्रो प्रकल्पांचा आढावा घेत, त्यासाठी कारशेडसाठी जागा आतापासूनच आरक्षित करा. पुढच्या वर्षीपासून ५० किमी मेट्रो दरवर्षी सुरू होईल, याबाबत नियोजन करा. यावर्षी किमान २३ किमी मेट्रो सुरू होईल. तसेच मेट्रो-३ मुळे २० ते २५ किलोमीटरची त्यात आणखी भर पडेल.

इंदू मिल येथील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक डिसेंबर २०२५ अखेरीस पूर्ण करा. तसेच हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे स्मारकाचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून या दोन्ही प्रकल्पांच्या वार्षिक देखभालीसाठी आराखडा आताच तयार करण्याच्या सूचना फडणवीस यांनी यावेळी दिल्या.

यावेळी मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, नगरविकास विभाग (१) चे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त संजय मुखर्जी, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव अश्विनी भिडे, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी,मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अतिरिक्त आयुक्त विक्रम कुमार , अश्विन मुदगल, महामुंबई मेट्रो संचलन महामंडळ व्यवस्थापकीय संचालक रुबल आगरवाल, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेंद्र कल्याणकर तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त संजय मुखर्जी यांनी प्राधिकरणाच्या माध्यमातून सुरू असलेल्या कामांचे सादरीकरण केले.

# दिवा डम्पिंगवरील कचऱ्याला आग



**ठाणे :** दिव्यातील बंद केलेल्या डम्पिंग गाऊंडवरील कचऱ्याला आग लागल्याची घटना गुरुवारी दुपारी सव्वा बारा ते साडे बारा वाजण्याच्या सुमारास समोर आली.

ही आग जवळपास अर्ध्या तासात नियंत्रणात आणण्यात ठाणे महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांना यश आले. ठामपा स्वच्छता निरीक्षक दीपक गुजराती यांनी दिवा साबेगाव, साळवी नगर येथे आग लागल्याबाबत आपत्ती व्यवस्थापन कक्षेत फोन करून माहिती दिली. त्यानंतर, घटनास्थळी घनकचरा विभागाचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेत, तातडीने कचऱ्याला लागलेल्या आगीवर नियंत्रण मिळविण्याचे काम हाती घेतल्यावर ती आग दुपारी एक वाजण्याच्या सुमारास नियंत्रणात आणली. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी दिली.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
www.diwanews.com
सोमवार, दि. ६ जानेवारी २०२५
पान : ४

# डीप क्लिनींगव्दारे हवा गुणवत्ता सुधारणेवर भर




## रस्त्यांवरील धुळीचे प्रमाण कमी करण्याकडे विशेष लक्ष

नवी मुंबई : महानगरपालिका क्षेत्रातील हवा गुणवत्तेमध्ये सुधारणा व्हावी हे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून रस्त्यांवरील धुळीचे प्रमाण कमी करण्याकडे विशेष लक्ष देत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ३० डिसेंबरपासून सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे.

या अंतर्गत आठही विभाग कार्यालय क्षेत्रात दिनांकनिहाय विविध रस्त्यांच्या सखोल स्वच्छेतेचे नियोजन करण्यात आले असून अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे परिमंडळ १ उपआयुक्त डॉ. अजय गडदे व परिमंडळ २ उपआयुक्त संतोष वारुळे तसेच परिमंडळ १ चे उपआयुक्त सोमनाथ पोटरे व परिमंडळ २ चे उपआयुक्त डॉ. कैलास गायकवाड यांच्यासह विभागांचे सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली संबंधित अधिकारी, कर्मचारीवृंद तसेच स्वच्छताकर्मी यांच्या माध्यमातून धुळीचे प्रदूषण कमी करण्याच्या दृष्टीने साफसफाई करण्यात येत आहे.

यामध्ये रस्ते, पदपथ यांच्या कडेला साठून राहिलेली गाळाची माती व कचरा यांची हँडब्रशने व त्यानंतर प्रक्रियाकृत पाणी मारुन यांत्रिकी वाहनाने साफसफाई करण्यात येत आहे. तसेच फॉगींग मशीनव्दारे हवेत पाण्याची फवारणी करुन धूळीचे प्रमाणही कमी करण्यात आले आहे. पदपथाच्या बाजूच्या भिंती, कुंपण, शिल्पाकृती यांचीही साफसफाई करण्यात आली आहे.

आज ४ जानेवारी रोजी बेलापूर विभागात क्रित फाऊंडेशन या स्वयंसेवी संस्थेच्या सहयोगाने सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी डॉ. अमोल पालवे यांच्या माध्यमातून बेलापूर जेट्टी, सेक्टर १५ याठिकाणी विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. तसेच हावरे सर्कल ते अपोलो सिग्नल या मुख्य रस्त्यावरील व परिसरातील सखोल स्वच्छतेला प्राधान्य देण्यात आले.

वाशी विभागातही सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी सागर मोरे यांच्या नियंत्रणाखाली जैन मंदिर ते संतोष डेअरी, सेक्टर ९ ए व १० ए या रस्त्यावर, पदपथावर व परिसरात सखोल स्वच्छता करण्यात आली. कोपरखैरणे विभागातील तीन टाकी ते वैकुंठधाम या परिसरात सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी सुनिल काठोळे यांच्या नियंत्रणाखाली त्याचप्रमाणे दिघा एमआयडीसीतील व्होडाफोन कंपनी ते स्मिथ हॉटेल या रस्त्यावर सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी भरत धांडे यांच्या नियंत्रणाखाली सखोल स्वच्छता मोहीम प्रभावीपणे राबविण्यात आली.

१३ जानेवारीपर्यंत दररोज अशा प्रकारच्या सखोल स्वच्छता मोहीमा आठही विभाग कार्यालय क्षेत्रात नियोजित कृती आराखड्यानुसार राबविण्यात येणार आहे.



# ठाण्यात शुक्रवारपासुन मालवणी महोत्सवाची धूम

## कोकण ग्रामविकास मंडळातर्फे १० ते १९ जाने.पर्यंत शिवाईनगर उन्नती मैदानात शानदार आयोजन

ठाणे : दरवर्षीप्रमाणे यंदा ठाण्यात मालवणी महोत्सवाची धूम ठाणेकर नागरिकांना येत्या शुक्रवारपासुन अनुभवयास मिळणार आहे. कोकण ग्रामविकास मंडळातर्फे येत्या १० जानेवारी ते १९ जानेवारी या कालावधीत ''मालवणी महोत्सव-२०२५'' चे आयोजन ठाणे पश्चिमेकडील पोखरण रोड नं. १, शिवाईनगर येथील उन्नती गार्डन मैदानात करण्यात आले आहे. महोत्सवाचे यंदा २६ वे वर्ष असुन मालवणी मेजवानीसह दशावतारी नाटक, डबलबारी, आदी महाराष्ट्राच्या विविधांगी संस्कृतीचे अविष्कार महोत्सवात पाहायला मिळणार आहेत. याशिवाय विद्यालय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी समुह नृत्यस्पर्धा आणि महिलावर्गासाठी ''खेळ पैठणीचा'' मध्ये महाराणी पैठणी जिंकण्याची संधी १० दिवस महोत्सवात मिळणार आहे. अशी माहिती मालवणी महोत्सवाचे आयोजक तथा कोकण ग्राम विकास मंडळ व ठाणे जिल्हा हौसिंग फेडरेशनचे अध्यक्ष सीताराम राणे यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत दिली.

कोकणातील शेतकरीव्यावसायिकांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी तसेच, मालवणी कला - संस्कृतीचा प्रसार आणि प्रचार व्हावा, या हेतुने गेली अनेक वर्षे सीताराम राणे ठाण्यात मालवणी महोत्सवाचे आयोजन करतात. १० जानेवारी रोजी सायंकाळी ७ वाजता ठाण्याचे जनसेवक आमदार संजय केळकर आणि जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्याहस्ते या मालवणी महोत्सव - २०२५ चे उद्घाटन होणार आहे. १० दिवस चालणाऱ्या या महोत्सवाला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे,मत्स्य व बंदरे मंत्री नितेश राणे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, भाजप नेते माजी मंत्री रविंद्र चव्हाण, विधान परिषदेचे गटनेते आ.प्रविण दरेकर,आ.निरंजन डावखरे,आ.निलेश राणे आदीसह विविध क्षेत्रातील मान्यवर भेट देणार आहेत.

मालवणी महोत्सवात एकुण ६० च्या आसपास व्यावासायिकांचे स्टॉल्स असुन प्रवेशद्वारावर यंदा पहिल्यांदाच कोकणातील कौलारू मंदिरामध्ये गणपती बाप्पा विराजमान झालेले पहायला मिळणार असुन हे अस्सल कोकणस्थ रेखीव मंदिर भाविक आणि खवय्यांच्या स्वागतासाठी सज्ज असणार आहे. महोत्सवाचे विशेष आकर्षण पिंगळा हा भारूडाचा श्रवणीय कार्यक्रम होणार आहे. महिलावर्गासाठी खेळ पैठणीचा, डबलबारी भजनाची जुगलबंदी आणि वेंगुर्ला येथील दशावतारी नाट्यप्रयोग सादर केला जाणार आहे. याशिवाय, मालवणी महोत्सवात दररोज स्थानिक बालगोपाळांचे कार्यक्रम व स्पर्धा सादर होणार आहेत.

१९ जानेवारी रोजी महोत्सवाची सांगता होईल. तरी, खेळ पैठणीचा व नृत्य स्पर्धेमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी आपली नावे मालवणी महोत्सवातील ठाणे हौसिंग फेडरेशनच्या स्टॉलमध्ये नोंदवावी. असे आवाहन महोत्सवाचे आयोजक सीताराम राणे यांनी केले आहे.

# संधिवातावर युनानी औषधी उपचाराची मात्रा

## ठाणे सिव्हील रुग्णालयातील युनानी उपचारांनी २० वर्ष जुन्या संधिवातावर रुग्णाला मिळाला गुण!

**ठाणे :** संधिवातामुळे शरीराच्या हालचाली कमी होऊन, काम करतेवेळी शारीरिक वेदना काही वेळा दुसऱ्यावर अवलंबून रहावे लागत असते.ॲलोपॅथिक उपचार केल्यावर देखील फारसा फायदा झालेल्या रुग्णांसाठी ठाणे सिव्हील रुग्णालय आयुष विभागातील युनानी औषधी उपचार कापिंग थेरेपी गुणकारी ठरताना दिसत आहे. गेल्या २० ते २५ वर्षांपासून सांधेदुखीचा त्रास असलेल्या रुग्णाला युनानीची मात्रा चांगलीच लागू पडल्याने रुग्णाला मोठा दिलासा मिळाला आहे.

ठाण्यात राहणारे सदाशिव मोरे (नाव बदलून) या ५६ वर्षांच्या गृहस्थांना २० ते २५ वर्षांपासून सांधेदुखीचा त्रास होता. सकाळी उठताना, चालताना, पाण्याचा नळ उघडता आदी कामानिमित्त शरीराची हालचाल करताना वेदना व्हायच्या. या त्रासातून मुक्ती मिळवण्यासाठी अनेक उपचार केले. मात्र उपचार निरर्थक झाले होते. या आजारातून कसा बरा होईन याचा विचार सुरू असताना ठाणे सिव्हील रुग्णालयातील आयुष विभागात चांगले उपचार होतात अशी माहिती त्यांना समजली. त्यानुसार युनानी औषधी उपचार कापिंग थेरेपीच्या माध्यमातून संधिवातावर जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलास पवार आणि अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धीरज महांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली सदाशिव यांच्या संधिवातावर सकारात्मक उपचार केले असल्याची माहिती युनानी तज्ज्ञ डॉ. झुबेर अन्सारी यांनी दिली.

सदाशिव हे गेल्या काही महिन्यांपासून आयुष विभागात उपचारासाठी येत असून, त्यांच्या संपूर्ण शरीराची मसाज, कपिंग थेरेपी, औषध आदीच्या माध्यमातून उपचार सुरू आहेत. त्यांना



***रुग्णालयाच्या आयुष विभागातील आयुर्वेदिक, होमियोपॅथी, युनानी आदी विभाग चांगल काम करत आहेत. ॲलोपॅथिक प्रमाणेच आता आयुष उपचार करण्यासाठी रुग्णांचा विश्वास वाढतो आहे. या पैकी युनानी औषधी उपचार कपिंग थेरेपी ही आखाती देशातील जुनी उपचार पद्धती आहे. यामध्ये कापिंग, मसाज आणि औषध आदीच्या माध्यमातून उपचार होतात. या उपचारांनी अनेक दुखणी बरी होताना दिसतात.***

*– **डॉ. कैलास पवार,** जिल्हा शल्य चिकित्सक, ठाणे.*

युनानी कापिग थेरेपीचा फायदा होत असल्याचे सदाशिव म्हणाले. शरीराची हालचाल चांगली होत असून वेदना देखील कमी झाल्या आहेत. ते आता स्वतःहून उठतात. अर्धातास मॉर्निंगवॉक, लिहिणे, धावणे, दोरीच्या उड्या आदी सर्व करत आहेत. तसा अभिप्राय देखील लिहीला आहे. सदाशिव यांच्यावर चांगले उपचार करण्यासाठी युनानी तज्ज्ञ डॉ. झुबेर अन्सारी, डॉ. लुकमान खान, मसाजिष्ट धनाजी कांबळे यांनी अथक परिश्रम घेतले आहेत.

# ठाण्यात चिनी मांजा आणि दोऱ्याला बंदी

## ठाण्यात २५५ आस्थापनांची केली तपासणी

## चिनी मांजांची विक्री होत असल्यास ८६५७८८७१०१ या टोल फ्री क्रमांकावर माहिती देण्याचे आवाहन



**ठाणे :** पतंग उडवण्यासाठी वापरला जाणारा प्लास्टिक किंवा सिंथेटिक पदार्थापासून तयार केलेला चिनी मांजा, चिनी दोरा किंवा नायलॉन किंवा प्लास्टिक कृत्रिम मांजा हा माणसांसाठी तसेच पक्ष्यांना घातक ठरतो. त्यामुळे या मांजांच्या वापरावर ठाणे महापालिका क्षेत्रात प्रतिबंध करण्यात आला आहे. महापालिका क्षेत्रात त्याअनुषंगाने करण्यात आलेल्या तपासणी मोहिमेत सर्व प्रभाग समिती क्षेत्रात एकूण २५५ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. त्यांच्याकडे चिनी मांजा आढळला नाही. मात्र, या तपासणीत एकल वापराचे सुमारे २१४ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. तसेच, ८९ हजार रुपयांचा दंड करण्यात आला.

पतंग उडवण्यासाठी तीक्ष्ण धातू किंवा काच घटक किंवा चिकट पदार्थ तसेच धागा मजबूत करणारा पदार्थ नसलेला केवळ सुती धागा वापरण्यास परवानगी आहे. चिनी मांजा म्हणून ओळखला जाणारा हा धागा तयार करण्यासाठी बारिक चूरा केलेली काच, धातू किंवा अन्य तिक्ष्ण पदार्थांचा वापर करण्यात येतो. अशा धाग्याचे उत्पादन, विक्री, साठवण आणि वापर यावर राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने निर्बंध घातलेले आहेत. या धाग्याचे जैविकरित्या विघटन होत नसल्याने मल प्रणाली, जलनि:सारण बाधित होते. तसेच असे पदार्थ खाल्ल्याने जनावरांनाही इजा होते. तसेच, हा धागा विद्युत वाहक असल्याने वीज साहित्य आणि वीज उपकेंद्र यांच्यावरही भार येऊन वीज पुरवठा खंडित होण्याची शक्यता असते.

### दक्षता पथकांमार्फत तपासणी सुरू

महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार, चिनी मांजा तथा सिंथेटिक-नायलॉन मांजाची विक्री, उत्पादन, साठवण आणि वापर टाळण्यासाठी प्रभाग समिती स्तरावर तपासणी आणि जप्ती मोहीम नियमितपणे राबविण्यात येत आहे. त्यासाठी, प्रत्येक प्रभाग समितीत सहाय्यक आयुक्त स्तरावर कर निरिक्षक, स्वच्छता निरिक्षक, आरोग्य निरिक्षक, प्रदूषण नियंत्रण कर्मचारी यांचे दक्षता पथक तयार करण्यात आले आहे. तसेच, स्थानिक पोलिसांनाही याविषयी माहिती देण्यात आली आहे. आतापर्यंत या तपासणी मोहिमेत सर्व प्रभाग समिती क्षेत्रात एकूण २५५ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. त्यांच्याकडे चिनी मांजा आढळला नाही.

### २१४ किलो प्लास्टिक जप्त

या तपासणी दरम्यान, एकल वापराचे सुमारे २१४ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. तसेच, ८९ हजार रुपयांचा दंड करण्यात आल्याची माहिती मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान यानी दिली.

### तक्रारीसाठी टोल फ्री क्रमांक व इमेल

प्रतिबंधित सिंथेटिक, नायलॉन मांजाची विक्री, उत्पादन, साठवण, पुरवठा किंवा वापर याबाबतच्या तक्रारी करण्यासाठी ८६५७८८७१०१ हा टोल फ्री क्रमांक नागरिकांसाठी उपलब्ध करण्यात आला आहे. त्याचबरोबर, .. या इमेलवरही तक्रार नोंदवता येईल. असे ही महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. ६ जानेवारी २०२५



www.diwanews.com

# आरपीएफ पोस्ट दिवा तर्फे 'स्मार्ट सहेली अभियान' संपन्न







दिवा:-आरपीएफ पोस्ट दिवा येथे स्मार्ट सहेली दिवा अभियानांतर्गत सदस्यांची मीटिंग आयोजित करण्यात आली होती. पोलीस निरीक्षक गिरीश तिवारी, उपनिरीक्षक पिंकी यादव यांच्या वतीने उपस्थित महिलांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. स्मार्ट सहेली अभियाना बाबत माहिती यावेळी उपस्थित महिलांना देण्यात आली व महिलांना विश्वास देण्यात आला की स्मार्ट सहेली ग्रुप च्या माध्यमातून प्रवासादरम्यान कोणती समस्या भेडसावल्यास आरपीएफच्या वतीने पूर्ण सहकार्य केले जाईल.यावेळी महिलांना प्रवासादरम्यान होणाऱ्या समस्या देखील जाणून घेण्यात आल्या.











दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. ६ जानेवारी २०२५




# पायाभूत सुविधा अत्याधुनिक तंत्रज्ञानासह उभाराव्यात
## – राज्यमंत्री माधुरी मिसाळ

मुंबई : नागरी भागाचा विकास करताना पायाभूत सोयी सुविधा अत्याधुनिक तंत्रज्ञानासह उपलब्ध करून देण्यात याव्यात. मल:निस्सारण केंद्र उभारणी, नाल्यांचे प्रदुषित पाणी एकत्रित करून संकलनासाठी वाहिन्या, जलपर्णी निर्मूलन या संदर्भातील कामांना गती देण्यात यावी. स्वच्छतेबाबतही जनजागृती करण्यासाठी योजना आखण्याच्या सूचना नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिल्या.

नगरविकास विभागाच्या विविध विकासकामांचा आढावा मंत्रालयात नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी घेतला. बैठकीत प्रकल्पांची सद्यस्थिती व आगामी कामांची रुपरेषा याबाबत चर्चा झाली.

नगरविकास राज्यमंत्री मिसाळ यांनी मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे महानगर विकास प्राधिकरण यांच्या यशस्वी कामांची माहिती तसेच प्रगतीपथावरील कामकाजाचा आढावा घेतला. पायाभूत सुविधा पुरविणे, पूल बांधणे, रस्ते विषयक कामकाज, पाणीपुरवठा, सोशल कल्चरल सेंटर उभारणे, एअरपोर्ट कनेक्टिव्हीटी उभारणे, क्रीडा संकुल, नगर रचना योजनांमध्ये पायाभूत सुविधा विकसित करणे, अर्बन ग्रोथ सेंटरमध्ये वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी रस्ते विकसित करणे, पर्यटन स्थळे, धार्मिक स्थळे, तलाव सुशोभीकरण, रस्ते चौपदरीकरण, मल्टीमोडल हब विकसित करणे, गृह योजना प्रकल्प उभारण्यासंदर्भातील कामांचाही यावेळी आढावा घेतला.

सांताक्रझ-चेंबूर लिंकरोड, मुंबईच्या धर्तीवर ठाणे येथे तयार करण्यात येणाऱ्या कोस्टल रोडबाबत तसेच नगरविकास विभागाच्या इतरही प्रकल्पांबाबतही चर्चा झाली. 'एमएमआरडीए'चे सह आयुक्त विक्रम कुमार, पुणे महानगर विकास प्राधिकरणचे आयुक्त योगेश म्हसे, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक शंतनु गोयल, 'एमआयडीसी'च्या मुख्य नियोजक सुलेखा वैजापूरकर उपस्थित होते.

# ठामपाच्या खत निर्मिती प्रकल्पाच्या मशीनला किरकोळ आग

**ठाणे:** मुंब्र्यातील कौसा कब्रस्तानच्या बाजूला असलेल्या ठाणे महानगरपालिकेच्या ग्रीन प्रोजेक्ट (ठामपा खत निर्मिती प्रकल्प) या ठिकाणी कंपोस्ट खत बनविण्याच्या कंपनीत आग लागली. त्या कंपनीमधील मशिनमध्ये ओव्हर हीट होऊन लागलेली आग किरकोळ स्वरूपाची होती. हा प्रकार शनिवारी सकाळी सव्वा नऊ वाजण्याच्या सुमारास समोर आला. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेत, तातडीने त्या आगीवर नियंत्रण मिळविले. सुदैवाने यामध्ये कोणालाही दुखापत किंवा कोणतीही जीवितहानी झालेली नाही. तर यावेळी ०१ रेस्क्यू आणि ०१ फायर इंजिन पाचारण करण्यात आले होते.









# भारतीय जनता पार्टीच्या दिवा- शहर आयोजित क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती आणि महिला मुक्ती दिना निमित्त विविध कार्यक्रम उत्साहात संपन्न

**दिवा:-** दिवा शहर भाजप महिला मोर्चाच्या अध्यक्षा सौ.सपना रोशन भगत यांच्या वतीने आधार कार्ड शिबिर व मतदार नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते . सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी मुंब्रादेवी कॉलनीतील रोशन भगत यांचे कार्यालयात येथे नवीन आधार कार्ड नोंदणी, आधार कार्ड बायोमेट्रिक, पत्ता बदलणे, नावात बदल, आधार कार्ड अपडेट,, नवीन मतदान नोंदणी, आयुष्यमान स्मार्ट कार्डचे वाटप करण्यात आले. या शिबिरात दिव्यातील शेकडो नागरिकांनी सहभाग घेतला. सदर शिबिराचे आयोजन सपना भगत, रोशन भगत यांनी केले होते .

यावेळी ठाणे जिल्हा अध्यक्ष संजय वाघुले, कल्याण जिल्हा सरचिटणीस नंदू परब, दत्ता माळकर, बिंदू दुबे, ठाणे जिल्हा कार्यकारणी सदस्य जिलाजित तिवारी, ठाणे जिल्हा युवा मोर्चा सरचिटणीस, दिवा मंडळ सरचिटणीस समीर चव्हाण, मधुकर पाटील, उत्तर भारतीय मोर्चा अध्यक्ष अशोक गुप्ता, व्यापारी सेल अध्यक्ष जयदीप भोईर, गौरीशंकर पटवा, रामबाबू सोनी, अजित केदारे, विठ्ठल गावडे, नितीन कोरगावकर, गणेश सावंत, सुरज पानसरे, अजित सातपुते, अंकित गुप्ता, मंगल राणे, यांच्यासह पदाधिकारी व महिला कार्यकर्ते उपस्थित होते.







